पुढारी

# एक लाख पदवीधरांना सरकार कुशल बनवणार

## प्रशासनासोबत मिळणार दीड वर्षे काम करण्याची संधी; महिना ९ हजार रुपये मानधन

अजय गोरड

**मुंबई** : बेरोजगार तरुणांना कौशल्याधारित बनवून रोजगारक्षम बनविण्याचा राज्य सरकारचा मानस आहे. त्यासाठी राज्य सरकारचा कौशल्य विकास विभाग कामाला लागला आहे. लवकरच महा- ई-स्कील योजना राबविण्यात येणार आहे. यात राज्यभरातील १ लाख पदवीधर तरुणांना सरकारी प्रशासनासोबत काम करण्याचा अनुभव घेता येईल.

योजनेचा कालावधी दीड वर्षाचा आहे. या काळात प्रशिक्षणार्थ्याला दरमहा ९ हजार रुपये मानधन मिळेल.

### 'सीएम फेलोशिप'ला पर्याय?

राज्यातील बेरोजगार तरुणांना कौशल्याधारित बनवून रोजगारक्षम बनविण्याचा महाविकास आघाडी सरकारचा हेतू आहे. असे असले तरी पाच वर्षांपूर्वी फडणवीस सरकारने सुरू केलेली 'सीएम फेलोशिप' हा कार्यक्रम महाविकास आघाडी सरकारने बंद केला आहे. त्याला पर्याय म्हणून महा- ई-स्कील योजना सुरू करण्यात येणार असल्याचे समजते.

येत्या १ मे रोजी महाराष्ट्रदिनी ही योजना सुरू करण्यासाठी राज्य सरकार प्रयत्नशील आहे. बेरोजगार तरुणांना कौशल्यपूर्ण बनवून रोजगारक्षम बनविण्यासाठी सरकारच्या वतीने कौशल्य विकास कार्यक्रम राबविला जातो. त्याच धर्तीवर राज्याच्या कौशल्य विकास मंत्रालयाने बेरोजगार तरुणांना प्रशासकीय कामाचा अनुभव देण्यासाठी एक कार्यक्रम आखला आहे. 'महाराष्ट्र रोजगार कौशल्य (महा- ई-स्कील) मिशन २०२०' असे या योजनेचे नाव असून, येत्या १ मे रोजी ती लाँच केली जाणार आहे. यात राज्यभरातील १ लाख शहरी, ग्रामीण बेरोजगार पदवीधर तरुणांना सामावून घेतले जाणार आहे. सुरुवातीला ६ महिने कार्यानुभव (प्रॅक्टिकल) व नंतर १२ महिने थेट प्रशासनासोबत काम करण्याची संधी, असे या योजनेचे स्वरूप असणार आहे. पहिले सहा महिने प्रशासनाचे काम याची संपूर्ण माहिती दिली जाईल. नंतर एक वर्ष प्रशासनातील विविध विभागात थेट काम करण्याची संधी मिळेल. या काळात तरुणांना प्रतिमहिना ९ हजार रुपये मानधन दिले जाईल.

Aurangabad Edition
16 Feb, 2020 Page No. 4
Powered by : erelego.com

***यह जानकारी का व्हिडियो देखने के नीचे दिए गए लिंक पर क्लिक करे***

https://youtu.be/nG9QOejvggw

https://digitaldg.in/